॥ ताटीचे अभंग ॥

योगी पावन मनाचा । साहे अपराध जनाचा ॥
विश्व रागें झालें वन्ही । संतीं सुखें व्हावें पाणी ॥
शब्दशास्त्रें झाले क्लेश । संतीं मानावा उपदेश ॥
विश्वपट ब्रह्मदोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

सुखसागरी वास झाला । उंचनीच काय त्याला ॥
अहो आपण जैसें व्हावें । देवें तैसेंचि करावें ॥
ऐसा नटनाट्य खेळ । स्थिर नाहीं एक वेळ ॥
एकापासोनी अनेक झालें । त्यासी पाहिजे सांभाळीलें ॥
शून्य साक्षित्वें समजावें । वेद ओंकाराच्या नावें ॥
एकें उंचपण केलें । एक अभिमानें गेलें ॥
इतुकें टाकुनि शान्ति धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

वरी भगवा झाला नामें । अंतरीं वश्य केला कामें ॥
त्याला म्हणों नये साधू । जगी विटंबना बाधू ॥
आपआपणा शोधुनि घ्यावें । विवेक नान्दे त्याच्यासवें ॥
आशा दंभ अवघे आवरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

सन्त तोचि जाणा जगीं । दया क्षमा ज्याचे अंगीं ॥
लोभ अहंता नये मना । जगीं विरक्त तोचि जाणा ॥
इहपरलोकीं सुखी । शुद्ध ज्ञान ज्याचे मुखीं ॥
मिथ्या कल्पना मागें सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

एक आपण साधू झाले । येर कोण वाया गेले ॥
उठे विकार ब्रह्मीं मूळ । अवघें मायेचें गाबाळ ॥
माया नुरे जेव्हां । विश्वब्रह्म होईल तेव्हां ॥
ऐसा उमज आदिअंतीं । मग सुखी व्हावें संतीं ॥
चिंता क्रोध मागें सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

ब्रह्म जैसें तैशापरी । आम्हा वडील भूतें सारीं ॥

हात आपुला आपणा लागे । त्याचा करूं नये खेद ॥
जीभ दातांनीं चाविली । कोणें बत्तिशी पाडिली ॥
थोर दुखावलें मन । पुढें उदण्ड शाहाणे ॥
चणे खावे लोखण्डाचे । मग ब्रह्मपदीं नाचे ॥
मन मारुनी उन्मन करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

सुखसागर आपण व्हावें । जग बोधें निववावें ॥
बोधा करूं नये अंतर । साधू नाहीं आपपर ॥
जीव जिवासी पैं द्यावा । मग करूं नये हेवा ॥
तरुणोपाय चित्तीं धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

अहो क्रोधें यावें कोठें । अवघें आपण निघोटें ॥
ऐसें कळलें उत्तम । जन तेचि जनार्दन ॥
ब्रीद बांधिलें चरणीं । न ये दावितां करणी ॥
वेळ क्रोधाचा उगवला । अवघा योग फोल झाला ॥
ऐसी थोर दृष्टी धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

सांडीं कल्पना उपाधी । तीच साधूला समाधी ॥
वाद घालावा कवणाला । अवघा द्वैताचा हो घाला ॥
पुढें उमजेना काय । उडत्याचे खालीं पाय ॥
एक मन चेष्टा करी । भुतें बापुडीं शेजारीं ॥
अवघी ईश्वराची करणी । काय तेथें केलें कोणी ॥
पुनः शुद्ध मार्ग धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

गिरिगव्हारें कशासाठीं । रागें पुरविली पाठी ॥
ऐसा नसावा संन्यासी । परमार्थाचा जो का द्वेषी ॥
घर बांधिलें डोंगरीं । विषया हिंडे दारोदारीं ॥
काय केला योगधर्म । नाही अन्तरीं निष्काम ॥
गंगाजळ हृदय करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

शुद्ध ज्याचा भाव झाला । दुरी नाहीं देव त्याला ॥
अवघीं साधनें हातवटी । मोले मिळत नाहीं हाटीं ॥
अहो आपण तैसें व्हावें । अवघें अनुमानोनी घ्यावें ॥
ऐसें केलें सद्गुरुनाथें । बाप रखुमादेवीकान्तें ॥
तेथें कोणी शिकवावें । सार साधुनीया घ्यावें ॥
लडिवाळ मुक्ताबाई । जीव मुद्दल ठायींचे ठायीं ॥

तुम्ही तरून विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

मुक्ताबाई

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated October 4, 1999